वाचले :-

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारित तरतूदी.

२) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दिनांक ०७ मे,२०२१.

३) पदोन्नती समिती सभा दि.२५/०६/२०२१ चा सभावृत्तांत.

४) मा.अति.आयुक्त, सो. यांचा दि. ०४ /१०/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८
क्र.माध्य/शि/०१/कावि/ ७४५ /२०२१
दि. ०४ /१०/२०२१

विषय –"मुख्याध्यापक" पदावरील पदोन्नतीबाबत......

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'मुख्याध्यापक' या अभिनामाची पदे पे.लेवल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरणेकामी दि.२५/०६/२०२१ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करणेत आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'मुख्याध्यापक' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता,मालमत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून, सहाय्यक शिक्षक पदावरील कर्मचा-यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दि.०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णयास अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात जेष्ठतेनुसार "मुख्याध्यापक" पदावर पे.लेव्हल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीत पदोन्नती देणेस शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नती मुळे द्यावयाचा आस्थापनेचे विद्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.मुदगुन पांडुरंग शंकर | जेष्ठतेनुसार | माध्यमिक विद्यालय,संततुकारामनगर |

सबब, मी अतिरिक्त, आयुक्त - (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करणेसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.०७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन राहून उपरोक्त नमूद सहा.शिक्षक पदावरील कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मुख्याध्यापक या पदावर आदेशाच्या दिनांकापासुन पे.लेव्हल S-१७ वेतनश्रेणी - ४७६०० - १५११००

या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विद्यालयामध्ये पदोन्नतीने पदस्थापना आदेशाच्या दिनांकापासुंन देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सही/-
(विकास ढाकणे)
अतिरिक्त आयुक्त- (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८.

प्रति,सर्व संबंधित कर्मचारी

प्रत,

१)लेखा विभाग २) लेखापरिक्षण

३) सर्व संबंधित विद्यालये ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

५) माध्यमिक शिक्षण विभाग टेबल क्र.२ व ३.

4.10.21

( संदिप खोत )
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे-१८.